ePaper
निवडणूक लागताच भाजप ॲक्शन मोडमध्ये, नेत्यांवर सोपवली महत्त्वाची जबाबदारी!
वर्ष - 9 । अंक -74 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- कौरचा वर्ल्डकप स्पेशल टॅटू!
- जेमिमा-राधा पुणेरी ढोलवर थिरकल्या!
- ब्राझील महिलेने २२ वेळा मतदान केलं
- चीनची टॅरिफबाबत मोठी घोषणा


www.mahaenews.com । गुरुवार, दि. 6 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## राज्यात नैसर्गिक संकट : हवामान विभागाचा धडकी भरवणारा इशारा

# महाराष्ट्रावर पुन्हा मोठं संकट!

## १० जिल्ह्यांना हाय अलर्ट; रब्बी हंगाम धोक्यात?

। मुंबई । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**राज्यात नुकताच पाऊस ओसरला असला तरी महाराष्ट्र पुन्हा एकदा नैसर्गिक संकटाच्या सावटाखाली आला आहे. भारतीय हवामान विभागाने (IMD) दिलेल्या ताज्या अंदाजानुसार राज्यात पुन्हा एकदा पावसाचे आगमन होणार असून, यावेळी १० जिल्ह्यांना हाय अलर्ट घोषित करण्यात आला आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे पुढील तीन ते चार दिवसांत मराठवाडा, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. राज्यात नैसर्गिक आव्हानांचा सिलसिला थांबण्याचे नाव घेत नाही. खरीप हंगामात पूर, अतिवृष्टी आणि वादळी पावसामुळे झालेल्या नुकसानीनंतर आता रब्बी हंगामावर पावसाचे सावट घोंघावत आहे. हवामान विभागाचा इशारा शेतकरी आणि प्रशासन दोघांसाठीही गंभीर संकेत आहे.**



पुढील काही दिवसांत पावसाचा प्रभाव किती राहतो हे पाहावं लागेल, पण सध्या तरी महाराष्ट्राने पुन्हा एकदा आकाशाकडेच आशेने पाहणं सुरू केलं आहे.

यामुळे आधीच खरीप हंगामात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची चिंता पुन्हा वाढली आहे. पावसाच्या सततच्या फेऱ्यांमुळे खरीप पीक जवळपास हातचा गेलेले असताना आता रब्बी हंगामही धोक्यात येऊ शकतो, अशी स्थिती निर्माण झाली आहे.

### पावसानं झोडपून काढलेलं महाराष्ट्राचं चित्र

यंदाचा मान्सून महाराष्ट्रासाठी अत्यंत कठीण ठरला. राज्यात सरासरीपेक्षा जास्त पावसाने हजेरी लावली. अनेक ठिकाणी नद्यांना आलेल्या पुरांमुळे शेकडो हेक्टर शेतजमीन पाण्याखाली गेली. काही जिल्ह्यांमध्ये तर खरीप पीक पूर्णपणे नष्ट झाले. शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादन मिळाले नाही, त्यामुळे आर्थिक संकट अधिक गडद झाले. शेतकरी पावसाच्या ओघात सावरत असतानाच आता पुन्हा एकदा आकाशात काळे ढग दाटू लागले आहेत. "या नव्या पावसामुळे रब्बी हंगामाची तयारी विस्कळीत होण्याची शक्यता" हवामानतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

### हवामान विभागाचा इशारा – १० जिल्ह्यांना हाय अलर्ट

भारतीय हवामान विभागाच्या मते, बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यातील हवामानात मोठा बदल होण्याची शक्यता आहे. या प्रणालीमुळे पावसासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. या पार्श्वभूमीवर कोकण आणि मराठवाडा विभागातील १० जिल्ह्यांना हाय अलर्ट देण्यात आला आहे. हे जिल्हे म्हणजे — रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, धाराशिव (उस्मानाबाद), लातूर, पुणे (दक्षिण भागात वादळी वाऱ्याची शक्यता)

या जिल्ह्यांमध्ये पुढील तीन ते चार दिवस वादळी वाऱ्यासह मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस होण्याची शक्यता असून, नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी सावधानता बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### पावसामुळे रब्बी हंगामावर संकट

खरीप हंगामात नुकसान झाल्यानंतर शेतकरी आता रब्बी हंगामासाठी सज्ज होत होते. अनेकांनी जमीनीची मशागत सुरू केली होती, तर काही भागांत पेरणीची प्रारंभिक तयारी सुरू झाली होती. मात्र नव्या पावसाच्या अंदाजामुळे ही सर्व योजना पुन्हा विस्कळीत होण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाच्या अहवालानुसार, राज्यातील जमिनीतील ओलावा अद्यापही पुरेशा प्रमाणात आहे. त्यामुळे पुन्हा एकदा झालेल्या पावसाने पेरणीस विलंब होईल आणि बियाण्यांचा अपव्यय वाढेल. कृषी तज्ज्ञांचा सल्ला आहे की, शेतकऱ्यांनी नव्या पावसाचा परिणाम पाहूनच पेरणीची तारीख ठरवावी.

राज्यातील काही भागांत ऊस, ज्वारी, गहू, हरभरा आणि मका या रब्बी पिकांची लागवड सुरु होण्याची तयारी होती. पण सलग पावसामुळे जमिनीवर पाणी साचल्यास बियाणे कुजण्याचा धोका संभवतो.

### थंडी थोडी उशिरा

हवामान विभागाने सांगितले आहे की पुढील दोन ते तीन दिवस राज्यातील तापमानात कोणताही मोठा बदल होणार नाही. दिवसाचे तापमान सध्या ३० ते ३२ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील, तर रात्रीचे तापमान २० ते २२ अंशांदरम्यान असेल. मात्र त्यानंतर थंडी हळूहळू वाढू लागेल.

"राज्यातील उत्तर भागात नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यानंतर गारठा जाणवू लागेल," असे हवामान खात्याचे म्हणणे आहे. पण कोकण, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात सध्या पावसामुळे थंडी थोडी उशिरा येण्याची शक्यता आहे.

### कमी दाबाचा पट्टा — पावसाचं मूळ कारण

हवामान खात्याच्या ताज्या उपग्रह चित्रांनुसार बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. या पट्ट्यामुळे दक्षिण भारतातून आर्द्र वारे महाराष्ट्राच्या दिशेने वाहत आहेत. यामुळे राज्यातील वातावरणात ओलावा वाढून पावसासाठी पोषक स्थिती निर्माण झाली आहे.

## नागरिकांना, प्रशासनाला सूचना

राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने हवामान विभागाच्या इशाऱ्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत.

नद्यांजवळ, धरणांच्या परिसरात किंवा ओढ्यांच्या काठावर अनावश्यक हालचाल टाळावी. शेतकऱ्यांनी पिकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी.

वीजेचा कडकडाट झाल्यास शेतात काम न करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

शाळा आणि स्थानिक प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घेण्याचे निर्देश दिले आहेत.

कोकण विभागात समुद्रकिनाऱ्याजवळील भागात मच्छीमारांना समुद्रात न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे, कारण पुढील काही दिवस समुद्रात वारे तीव्र राहतील.

पर्यावरणाला मदत

## पर्यावरणाला मदत करणाऱ्या कीटकांच्या कथा

# 'इन्सेक्ट टेल्स' या उपक्रमाची सुरुवात

## प्लॅस्टिक आणि थर्माकोलचे विघटन

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कीडा म्हटले, की आपण पटकन त्याला मारायलाच धावतो, पण जर हे टाळून त्यांची शास्त्रीय माहिती करून घेतली, तर ती आपल्यासाठी आणि पर्यावरणासाठीदेखील तितकीच फायदेशीर होऊ शकते. हा विचार करून कीटकशास्त्रज्ञ डॉ. राहुल मराठे यांनी सलग दोन वर्षे 'इन्सेक्ट टेल्स' या व्याख्यानमालेचा अनोखा उपक्रम राबवला. या उपक्रमाच्या निमित्ताने श्रीराम ओक यांनी त्यांच्याशी साधलेला संवाद.**



मी एक कीटक अभ्यासक असून, जीवशास्त्रात पीएचडी केली आणि काही काळ, प्राध्यापक आणि मग एका कंपनीमध्ये कीटक विभागप्रमुख म्हणून काम केले. कीटक आपल्यासाठी आणि पर्यावरणासाठीही उपयुक्त असतात, हे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'इन्सेक्ट टेल्स' हा उपक्रम सुरू झाला. या उपक्रमात एक पथ्य पाळले गेले, ते म्हणजे सगळी माहिती शास्त्रीयच द्यायची, पण ती रंजक होईल याची काळजी घ्यायची. कीटकांविषयी जनजागृती करणाऱ्या या व्याख्यानमालेचा उपक्रम 'मित्रकिडा फाउंडेशन फॉर इन्सेक्ट रिसर्च अँड कॉन्झर्व्हेशन'मार्फत राबवण्यात आला. आम्ही दोन वर्षांत २५ व्याख्याने दिली. कीटकांचे मानवाला होणारे उपयोग, याबद्दल अनेक प्रयोग आणि अभ्यास केला. त्यातून २०१९ मध्ये आमच्या 'मित्रकिडा बायोसोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड, पुणे' यामार्फत काही महत्त्वाचे प्रयोग आम्ही यशस्वी करून दाखवले. कचऱ्याची विल्हेवाट, प्लास्टिकचे विघटन-व्यवस्थापन-विल्हेवाट, थर्माकोल, पीपीई किट्स, फोम शीट्स अशा सगळ्या गोष्टींचे विघटन आणि ते नष्ट करण्याचे कार्य कीटक करू शकतात, हा अभ्यास जगासमोर आला. हे सगळे मित्रकीटक आम्हाला अभ्यासातून सापडले. भारतीय सेनेकरिता दारूगोळ्यांचे विघटन करण्याच्या कामापासून, विमानतळ परिसरात पक्ष्यांमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी मित्रकीटक उपयोगी पडतात. शेतात कीटकनाशकांच्या जागी मित्रकीटकांचा वापर फायदेशीर ठरतो. त्यासाठीचे मार्गदर्शन संस्थेमार्फत केले जाते. या सगळ्यात हव्या त्या कामासाठी योग्य कीटकांची निवड करावी लागते आणि त्याबरोबरच त्यांची पैदास करणेही आवश्यक असते. त्यामुळे आम्ही आमच्या प्रयोगशाळेत कीटकांची पैदासही करतो. कीटकनाशके वापरल्यामुळे कीटकांचा केवळ नाश होतो असे नाही, तर कीटकांबरोबरच शेतीवर आणि मनुष्यप्राण्यावरदेखील तेवढाच परिणाम होते. हे टाळण्यासाठी काही कीटकनाशकांऐवजी काही किड्यांचीच मदत घेता येईल का, असे मनात आले. त्यातून विविध कीटकांच्या अंगभूत क्षमतांचा बारकाईने अभ्यास सुरू झाला. त्यातून कीटकांची उपयुक्तता लक्षात आली.

निसर्गातील जैवविविधतेचा ७० टक्के भाग कीटकांनी व्यापलेला आहे. मुंग्या, डास, ढेकूण, पोरकिडे, सोंडेकिडे, मधमाश्या, गांधीलमाश्या, शतकिडे, कातकिडा असे किती तरी किडे आपल्या अवतीभोवती असतात. पर्यावरणाच्या दृष्टीने हे कीटक तितकेच महत्त्वाचे असतात, पण आपले एकूणच त्यांच्याकडे दुर्लक्ष झाले आहे, असे आम्हाला वाटले. त्यामुळेच आम्ही कीटकांविषयी जनजागृती करण्याचा वसा घेतला. कीटकांची शास्त्रीय माहिती लोकांपर्यंत पोहोचावी अशी गरज भासली. त्यातून नोकरी सोडून कीटकांमध्ये काम करायचे ठरवून त्यानंतर २०२३ मध्ये 'मित्रकीडा फाउंडेशन'ची निर्मिती झाली. या माध्यमातून किड्यांविषयी जनजागृती करण्याच्या कार्यात नूतन कर्णिक यांची मोलाची साथ फाउंडेशनला लाभते आहे. फाउंडेशच्या उद्दिष्टाला अनुरूप उपक्रम वर्षभर राबविताना कीटकांविषयीचे माहितीपट तयार करून ते शहरात, तसेच ग्रामीण भागांमधील शाळा-महाविद्यालयांतून दाखवले जातात.

### संरक्षण व्हावे हा हेतू

कीटकांविषयी शास्त्रीय माहिती देणे आणि कीटकांच्या प्रजाती नष्ट होऊ नयेत म्हणून आम्ही कार्यरत असतो. फाउंडेशनच्या माध्यमातून दर वर्षी पतंग सप्ताह (MOTH WEEK) साजरा करण्यात येतो. पतंगांची माहिती देणाऱ्या शिबिरांचे आयोजन या निमित्ताने करण्यात येते. यातून पतंगांचे संवर्धन, संरक्षण व्हावे हा हेतू असतो. पतंगांबरोबरच, काजव्यांसाठी, त्यांचे अधिवास सुरक्षित राहावेत, म्हणून प्रयत्न करतो.

# सातवीच्या परीक्षेचा अभ्यासक्रम जाहीर

## अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना परीक्षेची तयारी करावी लागणार

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील पाचवी आणि आठवी इयत्तांसह चौथी आणि सातवी या इयत्तांसाठीही यंदा शिष्यवृत्ती परीक्षा घेण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला. त्यानुसार चौथी आणि सातवीच्या परीक्षांसाठीचा अभ्यासक्रम राज्य परीक्षा परिषदेने जाहीर केला असून, या अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना परीक्षेची तयारी करावी लागणार आहे.**



राज्यातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मकतेकरिता प्रोत्साहन देण्यासाठी शिष्यवृत्ती परीक्षा आयोजित करण्यात येते. पूर्वी ही परीक्षा चौथी आणि सातवी या इयत्तांसाठी घेतली जात होती. मात्र, शिक्षण हक्क कायद्यातील (आरटीई) तरतुदी लक्षात घेऊन २०१६-१७ पासून ही परीक्षा पाचवी आणि आठवी या वर्गांसाठी लागू करण्यात आली. पाचवी आणि आठवीला शिष्यवृत्ती परीक्षा लागू केल्यापासून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे शिक्षण विभागाने पूर्वीप्रमाणेच चौथी आणि सातवीसाठी शिष्यवृत्ती परीक्षा लागू करण्याचा निर्णय घेतला.यंदा विशेष बाब म्हणून चौथी, सातवी, पाचवी, आठवी या इयत्तांसाठी परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेचा अभ्यासक्रम जाहीर होण्याची शिक्षक, विद्यार्थ्यांना प्रतीक्षा होती. त्यानुसार राज्य परीक्षा परिषदेने परीक्षेसाठीचा अभ्यासक्रम संकेतस्थळावर जाहीर केला आहे. चौथी आणि सातवीच्या परीक्षेत गणित, बुद्धिमत्ता चाचणी, प्रथम भाषा, इंग्रजी (तृतीय भाषा) या विषयांचा समावेश आहेप्र शब्दसंपत्तीवरील प्रभुत्व, कार्यात्मक व्याकरण, भाषाविषयक सामान्य ज्ञान; आरशातील प्रतिमा, तर्कसंगती, अनुमान, कूटप्रश्न, सांकेतिक भाषा असा अभ्यासक्रम आहे.

### शिष्यवृत्ती परीक्षा लागूचा निर्णय

प्रोत्साहन देण्यासाठी शिष्यवृत्ती परीक्षा आयोजित करण्यात येते. पूर्वी ही परीक्षा चौथी आणि सातवी या इयत्तांसाठी घेतली जात होती. मात्र, शिक्षण हक्क कायद्यातील (आरटीई) तरतुदी लक्षात घेऊन २०१६-१७ पासून ही परीक्षा पाचवी आणि आठवी या वर्गांसाठी लागू करण्यात आली. पाचवी आणि आठवीला शिष्यवृत्ती परीक्षा लागू केल्यापासून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे शिक्षण विभागाने पूर्वीप्रमाणेच चौथी आणि सातवीसाठी शिष्यवृत्ती परीक्षा लागू करण्याचा निर्णय घेतला.

पुनावळे परिसरातही डंपरमधून मुरूम व माती टाकण्याचा प्रकार

# रावेतमध्ये पवनेच्या नदीपात्रात पुन्हा भराव!

## प्रशासनाचे मौन, पर्यावरणप्रेमी संतप्त, कारवाई करण्याची मागणी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : पुणे-बंगळुरू एक्स्प्रेस हायवेलगत रावेत- पुनावळे हद्दीतील कळमजाई मंदिराजवळ पवना नदीच्या पात्रात मुरूम आणि मातीचा भराव टाकण्याचा प्रकार समोर आला आहे.**



दिवसाढवळ्या सुरू असलेला हा प्रकार प्रशासनाच्या डोळ्यांसमोर चालू असून, बांधकाम व्यावसायिकांकडून नदीपात्र अरुंद करण्याचा उघड प्रयत्न सुरू आहे. या बेकायदेशीर कामाकडे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण ~~विभागासह पवना प्रकल्प विभागाने~~ जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींनी केला आहे. पवना नदी ही शहराचे जीवन आहे; मात्र अधिकाऱ्यांचे मौन आणि बांधकाम व्यावसायिकांची बेधडक मनमानी यामुळे नदी मृतप्राय अवस्थेत पोहोचत असल्याचे त्यांनी म्हटले. एक्स्प्रेस हायवेलगतचा रावेत परिसर या अनधिकृत भरावाचा नवा केंद्रबिंदू बनला आहे.

रावेत येथील एक्सप्रेस हायवेच्या दोन्ही बाजूंनी पवना नदीचा प्रवाह संथ गतीने वाहतो. परंतु गेल्या काही दिवसांपासून या परिसरात डंपरमधून मुरूम व खोदकामाचा भराव नदीपात्रात टाकण्याचे प्रकार जोरात सुरू आहेत. काही ठिकाणी भराव इतका वाढवण्यात आला. आहे की नदीचा प्रवाह फक्त काही फुटांवर येऊन थांबला आहे. स्थानिक रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, रावेत आणि पुनवळे भागातील काही बांधकाम व्यावसायिक प्रकल्पांमधील खणकामातून निघालेला रूम व राडारोडा थेट नदीपात्रात टाकून जागा वाढवत आहेत. हे प्रकार पोलिस ठाण्याच्या आणि प्रशासनाच्या हद्दीत घडत असूनही कोणतीही कारवाई होत नाही, अशी तक्रार त्यांनी केली आहे.

२०१३ मध्ये पवना धरणक्षेत्रात १४८ मिमीपेक्षा अधिक पाऊस पडल्याने शहरातील पिंपळे गुरव, सांगवी, काळाखडक या भागात घरांत पाणी शिरले होते. त्याचप्रमाणे २०१९ मध्ये पुन्हा एकदा पवना नदीने महापुराचे रूप घेतले होते. तरीही नदीपात्रात भराव टाकण्याचे प्रकार थांबले नाहीत. भविष्यात अशीच परिस्थिती पुन्हा निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे. रावेत एक्सप्रेस हायवे लगत, कळमजाई मंदिराजवळ आणि संत तुकाराम महाराज पूल परिसरात भराव टाकण्याचे काम सुरू आहे. अनेक डंपर मुरूम व माती घेऊन येताना आणि थेट नदीकाठावर रिकामे होताना दिसत आहेत. स्थानिकांच्या मते गेल्या काही वर्षांत या भागातील नदीपात्र ५ ते १० फूटांनी अरुंद झाले आहे. त्यामुळे परिसरात पूर येण्याचा धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने योग्य त्या उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

> “ नदीपात्रात भराव टाकणाऱ्यांवर तातडीने गुन्हे दाखल करून कारवाई केली जाईल. संबंधित गाडी मालक, चालक व जागामालक यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या कामासाठी पथके तयार आहेत.
>
> **-शेखर सिंह,** सहशहर अभियंता, पर्यावरण विभाग

# अग्निसुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या व्यावसायिकांना नोटिसा

## कारवाई करण्याचा तळवडे अग्निशमन'चा इशारा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या काही वर्षात पिंपरी- चिंचवड शहरातील औद्योगिक वसाहती, तसेच रहिवासी भागांमध्ये आगीच्या घटनांमध्ये झालेली वाढ चिंताजनक बनली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन आणि अग्निशमन विभागाकडून वारंवार जनजागृती केली जात असून, मॉकड्रिलसारखे उपक्रमही राबवले जात आहेत. तरीसुद्धा अनेक व्यावसायिक आणि रहिवासी सोसायट्या अग्निसुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे आता संबंधितांवर कारवाई करण्याची तयारी सुरू केली असल्याची माहिती तळवडे अग्निशमन विभागाकडून दिली आहे..**

व्यावसायिकांना चिखली, तळवडे परिसरात हजारो लघुउद्योगांमध्ये ज्वलनशील पदार्थाचा वापर आणि साठा केला जातो. महापालिकेकडून अग्निशमन यंत्रणा बसवून कार्यान्वित ठेवण्यासाठी लेखी सूचना दिल्या आहेत; परंतु या सूचनांकडे दुर्लक्ष केल्याने वारंवार आगीच्या दुर्घटना घडत आहेत. अनेक सोसायट्यांतील अग्निशमन यंत्रणा बंद असल्याचे आढळले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत नियमांचे पालन न करणाऱ्या व्यावसायिकांवर कारवाईची मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती अग्निशमन विभागाकडून देण्यात आली.

सुरक्षा यंत्रणा अनिवार्य असणारे व्यवसाय रंगकाम, रासायनिक प्रक्रिया, वेल्डिंग, हार्डवेअर, ऑइल, थिनर, चिकट रसायने, लाकूड किंवा कागद निर्मिती, अन्नप्रक्रिया उद्योग, हॉटेल व्यवसाय यांमध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यरत असणे बंधनकारक आहे. असे सर्व प्रकारचे व्यवसाय तळवडे मध्ये सध्या कार्यरत आहेत त्यामुळे तळवडे अग्निशमन केंद्राने तातडीने व्यवसायिकांनी अग्नि सुरक्षा नियमांकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची गरज असल्याचे म्हटले आहे.

> “ तळवडे अग्निशमन केंद्राच्या अखत्यारीतील व्यावसायिकांना नोटिसा बजावल्या आहेत. नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. व्यवसायाचे नुकसान टाळण्यासाठी अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित कराव्यात.
>
> **-बालाजी वैद्य,** अग्निशमन उपअधिकारी, तळवडे केंद्र.

> “ कारवाई टाळण्यासाठी नव्हे, तर स्वतःच्या आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी अग्निशमन साधने कार्यरत ठेवावीत. महापालिकेनेही याबाबतीत व्यावसायिकांना मार्गदर्शन व सहकार्य करावे.
>
> **-संदीप बेलसरे,** अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटना.



# एवढे अनर्थ एका कायद्याने केले




**उद्योगपतींना भीती वाटते की, सरकार केव्हाही साठा "जप्त" करू शकते. त्यामुळे कोल्ड स्टोरेज, वेअरहाउसिंग आणि अन्नप्रक्रिया उद्योगात गुंतवणूक करीत नाहीत. परिणामत: कृषी विपणन साखळी नीटपणे बनू शकली नाही आणि शेतमालाची नासाडी वाढली. शेती व्यावसाय अडचणीत आला.**

आवश्यक वस्तू कायद्यामुळे सरकारी अधिकारी वर्गाला साठेबाजी विरोधी व अन्य बाबतीत कारवाईचे अमर्याद अधिकार मिळाले आहेत, हे अधिकार मनमानी, भ्रष्टाचार आणि दडपशाहीसाठी वापरले गेले. परिणामत: प्रामाणिक व्यापारी व शेतकरी दोघेही त्रस्त झाले.शेतकरी पुन्हा पुन्हा कर्जबाजारी का होतो? या प्रश्नाचे उत्तरही तेच आहे जे शेतकरी आत्महत्या का करतो, या प्रश्नाचे आहे. शेतकऱ्यांच्या दररोज आत्महत्या होतात, त्याची तुम्ही दखल घेतली नाही. असो, कर्जमाफीच्या निमित्ताने का होईना त्याचा विचार करायचे म्हणतात. हेही नसे थोडके.शेतकरी पुन्हा पुन्हा कर्जबाजारी होतो, याला शेतकरी कारणीभूत नसून खुद्द सरकार कारणीभूत आहे हे सर्वप्रथम लक्षात घेतले पाहिजे. कमाल शेतजमीन धारणा कायद्यामुळे जमिनीचे विखंडन झाये आहे. आज सरासरी धारणा (होल्डिंग) २ एकर पेक्षा कमी झाली आहे. हे क्षेत्र आजच्या शेती पद्धतीत




'अन-इकॉनॉमिक] मानले जाते. हा सीलिंगचा कायदा कालबाह्य झाला आहे. तो आणला होता सरकारने, राबवविला सरकारने, रद्द कोण करणार? सरकारलाच रद्द करावा लागेल. हा कायदा रद्द करणे राज्य सरकारच्या अधिकारात आहे. केवळ सीलिंग कायदाच नव्हे, त्याच्या जोडीला आवश्यक वस्तू कायदा ही तेवढाच राक्षसी आहे. आवश्यक वस्तू कायदा- १९५५ हा कायदा जनतेला 'आवश्यक वस्तू' वाजवी दरात मिळाव्यात म्हणून आणला, असे सरकार तर्फे सांगण्यात आले होते, पण प्रत्यक्षात त्याचा लाभ गोरगरिबांना कधीच मिळाला नाही. उलट या कायद्याचा लाभ उठवून पुढारी व अधिकारी मात्र गब्बर झाले. आवश्यक वस्तू कायद्याचा वापर करून शेतमालाच्या किंमती पाडण्यात आल्या, या कायद्याच्या धास्तीने साठवणुकीच्या व्यवस्था निर्माण होऊ शकल्या नाहीत. या कायद्याचा आधार घेऊन नोकरशाहीने भरपूर भ्रष्टाचार केला, कृत्रिम टंचाईमुळे महागाई वाढली, बाजाराचे 'मागणी आणि पुरवठ्याचे' तत्व पायदळी तुडवले केले, बचत न राहिल्यामुळे शेतकरी देशोधडीला लागले, म्हणून शेतकरी वारंवार कर्जबाजारी होतो. एवढे अनर्थ एका कायद्याने केले. आवश्यक वस्तू कायद्याने अनेक अनर्थ केले आहेत. त्यांचा आढावा पुढे घेण्यात आला आहे सरकार या कायद्याखाली धान्य, डाळी, तेलबिया, साखर इत्यादी वस्तूंवर साठवणूक, वाहतूक, दर नियंत्रण यासाठी सक्ती करू शकते. त्यामुळे व्यापारी आणि प्रक्रिया उद्योग शेतकऱ्यांकडून योग्य दराने खरेदी करत नाहीत. परिणामत: शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य बाजारभाव मिळत नाही आणि तोटा होतो. वारंवार तोटा होत राहिल्यामुळे शेतकरी देशोधडीला लागले.उद्योगपतींना भीती वाटते की, सरकार केव्हाही साठा "जप्त" करू शकते. त्यामुळे कोल्ड स्टोरेज, वेअरहाउसिंग आणि अन्नप्रक्रिया उद्योगात गुंतवणूक करीत नाहीत. परिणामत: कृषी विपणन साखळी नीटपणे बनू शकली नाही आणि शेतमालाची नासाडी वाढली. शेती व्यावसाय अडचणीत आला.

आवश्यक वस्तू कायद्यामुळे सरकारी अधिकारी वर्गाला साठेबाजी विरोधी व अन्य बाबतीत कारवाईचे अमर्याद अधिकार मिळाले आहेत, हे अधिकार मनमानी, भ्रष्टाचार आणि दडपशाहीसाठी वापरले गेले. परिणामत: प्रामाणिक व्यापारी व शेतकरी दोघेही त्रस्त झाले.जेव्हा सरकार बंधन घालते तेव्हा व्यापारी आपला माल बाजारात आणत नाहीत. पुरवठा कमी होतो, आणि कृत्रिम टंचाईतून कृत्रिम महागाई निर्माण होते. त्यामुळे जनतेला वस्तू महाग मिळतात — ज्या वस्तू 'स्वस्त मिळाव्यात' म्हणून कायदा बनवला गेला, असे सरकार म्हणत होते, त्याच कायद्यामुळे महागाई वाढू लागली. ही विपरीत परिस्थिती अनेकदा दिसून आली तरी कोणतेच सरकार त्याबाबत पुनर्विचार करीत नाही.बाजारात मागणी-पुरवठ्याच्या नैसर्गिक संतुलनावर सरकारी हस्तक्षेपामुळे दुष्परिणाम होतो. त्यामुळे शेतकरी उत्पादनाच्या योजना आखू शकत नाहीत — कोणते पीक पेरावे, किती उत्पादन घ्यावे, याबाबत अनिश्चितता वाढते. हा कायदा लोकहितासाठी आहे.

## प्रासंगिक »

### एक माघार?

***ऑक्टोबरमधील दोन आकडेवाऱ्या देशातील खनिज तेल अभ्यासक आणि विश्लेषकांसाठी लक्षवेधी ठरल्या. जगभर तेलवाहू जहाजांच्या हालचालींची माहिती मिळवून ही आकडेवारी खणली जाते.***

'रॉयटर्स' वृत्तसंस्थेने संपूर्ण महिन्याच्या आकडेवारीचा दाखला देत रशियातून भारतात झालेल्या तेल आयातीत किंचित वाढ झाल्याचे म्हटले आहे. सप्टेंबर महिन्याच्या १४.४ लाख पिंपे प्रतिदिन (बीपीडी) आयातीच्या तुलनेत ऑक्टोबर महिन्यात १४.८ लाख पिंपे प्रतिदिन इतके तेल आयात झाले. पण ही आकडेवारी फसवी ठरण्याची शक्यता अधिक. या रशियन तेल कंपन्यांकडून प्राधान्याने तेलाची आयात करतो, त्यांच्यावर २२ ऑक्टोबर रोजी अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने कडक निर्बंध जाहीर केले. हे निर्बंध येत्या २१ नोव्हेंबरपासून लागू होत आहेत. त्यानंतर अमेरिकी निर्बंधांची झळ पोहोचू नये यासाठी भारतातील खासगी आणि सरकारी तेल शुद्धीकरण कंपन्यांनी दोन प्रतिबंधित रशियन कंपन्यांकडून तेल खरीदणे कमी केले आहे किंवा थेट थांबवले आहे.

**हरियाणातील अंबाला येथील एका वृद्ध महिलेला आणि तिच्या पतीला सीबीआय, अंमलबजावणी संचालनालय (ईडी) आणि न्यायव्यवस्थेचे अधिकारी असल्याचे भासवून फसवणूक करणाऱ्यांनी 'डिजिटल पद्धतीने अटक' केली. या जोडप्याची १.०५ कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली.**

# सायबर भामटे लोकांना जाळ्यात अडकवतात

भारतीय दंड संहितेच्या (आयपीसी) विविध कलमांखाली या प्रकरणात दोन एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणानंतर सर्वोच्च न्यायालयाने 'डिजिटल अरेस्ट' या प्रकाराची गांभीर्याने दखल घेतली आहे. आणि या 'धक्कादायक' समस्येवर त्वरित कारवाई व्हायला हवी असे म्हटले आहे.'डिजिटल अरेस्ट'हा लोकांना गंडवण्यासाठीचा सायबर गुन्हेगारांचा फंडा सध्या प्रचंड फोफावला आहे. त्याअंतर्गत सायबर गुन्हेगारांनी डिजिटल अरेस्टची भीती दाखवत देशभरातील वृद्धांसह निष्पाप लोकांची तीन हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची फसवणूक केली आहे. हे घोटाळेबाज लोकांना धमकावण्यासाठी पोलीस, सरकारी अधिकारी किंवा न्यायालयांचे प्रतिनिधी असल्याचा बनाव रचतात. बनावट व्हिडिओ आणि ऑडिओ कॉलचा वापर करून बनावट कागदपत्रे आणि खोटे न्यायालयीन आदेश सादर करून, ते अटक किंवा कायदेशीर कारवाईपासून



संरक्षण करण्याच्या नावाखाली ज्येष्ठ नागरिकांसह पीडितांकडून मोठ्या प्रमाणात पैसे उकळतात. त्यामुळे लोकांनी सावध राहणे गरजेचे आहे. पण अनेकदा तसे होत नाही आणि साधे, भोळेभाबडे लोक या सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अलगद सापडतात. मोबाइल आणि सहज उपलब्ध असलेले इंटरनेट या दोन्ही गोष्टी त्यासाठी कारणीभूत ठरत आहेत.

आजकाल मोबाईल जवळ नसलेला माणूस शोधूनही सापडणार नाही. मोबाइल जेवढा चांगला तेवढे फसवणुकीचे प्रकार असे नजीकच्या कित्येक घटनांवरून पुढे आले आहे. अनेकजण फेसबुक, व्हॉट्सॲपवर येणाऱ्या लिंकवर उत्सुकतेपोटी क्लिक करतात आणि सायबर भामट्यांच्या जाळ्यात अडकतात. हे फक्त अशिक्षितच नाही, तर सुशिक्षित लोकांच्या बाबतीतही घडते. फेसबुकवर अनेकदा सुंदर, देखण्या मुलीचे फोटो, विडियो असतात. त्यातील एखाद्या सुंदर मुलीची फ्रेंड रिक्वेस्ट ॲक्सेप्ट केली जाते. आणि तेथून खरा खेळ सुरू होतो. मग चॅटिंग सुरू होते. फोटो, विडियो शेअर होतात. खोट्या दुखभऱ्या कहाण्या शेअर केल्या जातात. मग ती हळूहळू शेअर मार्केट, रेटिंग, गेमिंग किंवा इतर कोणत्या तरी ॲपची लिंक पाठवून त्यावर जॉइन करायला सांगते. लाखोंच्या फायद्याचे आमिष दाखवते. तो पर्यन्त सावज पूर्ण टप्यात आलेले असते. मग लॉगिन केल्यावर त्यात सुरूवातीला काही हजार रुपये जमा कारायाला सांगितले जाते. नंतर ते लाखांवर जाऊन पोहोचते, त्यात लाखोंचा फायदा झालेला दिसतो. आणि सावज त्यात पूर्ण अडकून लाखो रुपयांना गंडवले जाते. किंवा एआयच्या मदतीने त्या दोघांचे एकत्र व्हिडिओ बनवून ब्लॅकमेल केले जाते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## यंदा ५९ व्या स्थानावर घसरण

## क्यूएस क्रमवारीत भारतातील संस्थांची घसरण

# भारतीय शिक्षण क्षेत्राला झटका!

### आयआयटी दिल्ली देशात अव्वल




### दिल्ली विद्यापीठ ९५ व्या स्थानी

आयआयटी दिल्लीने देशात अव्वल राहण्याचा मान कायम ठेवला असला तरी गतवर्षीच्या ४४ व्या स्थानावरून यंदा ५९ व्या स्थानावर घसरण झाली आहे. त्याचबरोबर आयआयएससी बंगळुरूची ६२ व्या स्थानावरून ६४ व्या स्थानी, आयआयटी मद्रासची ५६ व्या स्थानावरून ७० व्या स्थानी, आयआयटी कानपूर आणि आयआयटी खरगपूर अनुक्रमे ६७ व्या आणि ६० व्या स्थानावरून ७७ व्या स्थानी आणि दिल्ली विद्यापीठ ८१ व्या स्थानावरून ९५ व्या स्थानी घसरले आहे.

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शैक्षणिक संस्थांची जागतिक क्रमवारी ठरविणाऱ्या क्यूएस क्रमवारी मंगळवारी जाहीर करण्यात आली. यंदा आशियाई विद्यापीठांच्या अव्वल १०० संस्थांच्या यादीत भारतातील सात शैक्षणिक संस्थांनी स्थान मिळवले असले तरी गतवर्षीच्या तुलनेत यंदा देशातील प्रमुख संस्थांच्या विशेषतः आयआयटींच्या क्रमवारीमध्ये मोठी घसरण झाली आहे. यंदा आयआयटी दिल्ली आणि मुंबईने पहिल्या १०० संस्थांमध्ये स्थान मिळवले आहे.**

लंडनमधील क्वाक्वेरेली सायमंड्सने (क्यूएस) जाहीर केलेल्या आशियाई विद्यापीठांच्या क्रमवारीमध्ये अव्वल १०० संस्थांच्या यादीत सात भारतीय संस्थांनी स्थान मिळवले आहे. यामध्ये आयआयटी दिल्लीने सलग पाचव्या वर्षी भारतातील सर्वोत्तम शैक्षणिक संस्था म्हणून नावलौकिकी कायम ठेवला आहे.त्यानंतर आयआयएससी बंगळुरू ६४ व्या, आयआयटी मद्रास ७० व्या, आयआयटी मुंबई ७१ व्या, आयआयटी कानपूर आणि आयआयटी खरगपूर ७७ व्या आणि दिल्ली विद्यापीठ ९५ व्या क्रमांकावर आहे. त्याचबरोबर पहिल्या २०० मध्ये २० आणि ५०० संस्थांमध्ये ६६ संस्थाचा समावेश आहे. मात्र गतवर्षीच्या तुलनेत यंदा देशातील शैक्षणिक संस्थांच्या क्रमवारीमध्ये मोठ्या प्रमाणात घसरण झाली आहे. आयआयटी दिल्लीने देशात अव्वल राहण्याचा मान कायम ठेवला असला तरी गतवर्षीच्या ४४ व्या स्थानावरून यंदा ५९ व्या स्थानावर घसरण झाली आहे. त्याचबरोबर आयआयएससी बंगळुरूची ६२ व्या स्थानावरून ६४ व्या स्थानी, आयआयटी मद्रासची ५६ व्या स्थानावरून ७० व्या स्थानी, आयआयटी कानपूर आणि आयआयटी खरगपूर अनुक्रमे ६७ व्या आणि ६० व्या स्थानावरून ७७ व्या स्थानी आणि दिल्ली विद्यापीठ ८१ व्या स्थानावरून ९५ व्या स्थानी घसरले आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा देशातील १०५ संस्थांच्या क्रमवारीत घसरण झाली असून, १६ संस्थांचे स्थान कायम राहिले आहे, तर ३६ संस्थांच्या क्रमवारीत सुधारणा झाली आहे.गेल्या वर्षीच्या तुलनेत भारतीय शैक्षणिक संस्थांच्या गुणांमध्ये सुधारणा झाली असली तरी आशियातील अन्य संस्थांच्या तुलनेत क्रमवारीत घसरण झाल्याचे क्यूएसने जाहीर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. शैक्षणिक प्रतिष्ठा, कर्मचारी प्रतिष्ठा, प्राध्यापक – विद्यार्थी गुणोत्तर, आंतरराष्ट्रीय संशोधन नेटवर्क, प्रबंध, शिक्षकांनी सादर केलेले प्रबंध, पीएचडी असलेले कर्मचारी, आंतरराष्ट्रीय प्राध्यापक, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी यांच्या आधारे क्रमवारी जाहीर करण्यात येते. भारतीय शैक्षणिक संस्थांची घसरण प्रामुख्याने प्रबंध, प्राध्यापक-विद्यार्थी गुणोत्तर, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी गुणोत्तर या निकषांमध्ये झाली आहे. शैक्षणिक संस्थांची जागतिक क्रमवारी ठरविणाऱ्या क्यूएस क्रमवारी मंगळवारी जाहीर करण्यात आली. यंदा आशियाई विद्यापीठांच्या अव्वल १०० संस्थांच्या यादीत भारतातील सात शैक्षणिक संस्थांनी स्थान मिळवले असले तरी गतवर्षीच्या तुलनेत यंदा देशातील प्रमुख संस्थांच्या विशेषतः आयआयटींच्या क्रमवारीमध्ये मोठी घसरण झाली आहे. यंदा आयआयटी दिल्ली आणि मुंबईने पहिल्या १०० संस्थांमध्ये स्थान मिळवले आहे. केलेल्या आशियाई विद्यापीठांच्या क्रमवारीमध्ये अव्वल १०० संस्थांच्या यादीत सात भारतीय संस्थांनी स्थान मिळवले आहे. यामध्ये आयआयटी दिल्लीने सलग पाचव्या वर्षी भारतातील सर्वोत्तम शैक्षणिक संस्था म्हणून नावलौकिकी कायम ठेवला आहे. त्यानंतर आयआयएससी बंगळुरू ६४ व्या, आयआयटी मद्रास ७० व्या, आयआयटी मुंबई ७१ व्या, आयआयटी कानपूर आणि आयआयटी खरगपूर ७७ व्या आणि दिल्ली विद्यापीठ ९५ व्या क्रमांकावर आहे.

# राज ठाकरेंवर श्रीकांत शिंदेंची जोरदार टीका

## ज्यांच्याकडून काही चांगलं होऊ शकत नाही ते तोडफोडीचीच करणार



### राज ठाकरेंवर टीका केली

मात्र कधीकाळी यांनीही नरेंद्र मोदींचे कौतुक केलं होतं." असं श्रीकांत शिंदे यांनी म्हटलं आहे. निवडणुकीपासून आत्तापर्यंत राज ठाकरेंबाबत काहीही टीका केली नव्हती. आता मात्र त्यांनी जे काही निर्माण करु शकत नाहीत असे लोक तोडफोडीचीच भाषा करणार म्हणत राज ठाकरेंवर टीका केली आहे.

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्रातील गड किल्ल्यांवरील नमो केंद्रांवरून राज ठाकरे यांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदेंनी पहिल्यांदाच त्यांच्यावर टीका केली आहे. हे लोक काहीही निर्माण करू शकत नाहीत, त्यामुळे हे तोडफोडीचीच भाषा करणार अशी टीका श्रीकांत शिंदे यांनी केली.**

खासदार श्रीकांत शिंदे यांनी पहिल्यांदाच राज ठाकरेंवर थेट टीका केली आहे. राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीच्या वेळी महायुतीचा प्रचार केला होता. धनुष्याबाण असलेल्या मंचावर राज ठाकरे अनेक वर्षांनी दिसले होते. दरम्यान आता श्रीकांत शिंदे यांनी राज ठाकरेंबाबत प्रश्न विचारला असता पहिल्यांदाच टीका केली आहे. तसंच उद्धव ठाकरेंच्या मराठवाडा दौऱ्यावरही श्रीकांत शिंदेंनी टीका केली आहे. उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले की, "लोकांना कोण खरं कोण खोटं, कोण देणार आहे, कोण घेणार आहे... हे सगळं माहीत असतं. आता अतिवृष्टी झाली त्यावेळेस महायुती सरकारने ३१ हजार कोटींचं पॅकेज दिलं. ज्यावेळेस आमचे कार्यकर्ते शेतकऱ्यांना भेटायला गेले तर त्यांनी काही ना काही सोबत नेलं होतं. मात्र उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांसाठी काहीही केलं नाही. त्यामुळे आता शेतकरी यांच्या दौऱ्याकडे पाठ फिरवत आहेत.

आता ते दौरे करत आहेत, निवडणुकीपूर्वी काहीतरी आश्वासने देतील. मात्र लोकांचा विश्वास त्यांच्यावर राहिला नाही. तसंच माझ्याकडे काही नाही हे ते स्वतःच सांगत आहेत." असा टोला श्रीकांत शिंदेंनी लगावला. यानंतर नमो केंद्रांबाबत राज ठाकरेंनी जो इशारा दिला आहे त्याबाबत श्रीकांत शिंदेंना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर श्रीकांत शिंदे यांनी राज ठाकरेंवर पहिल्यांदाच टीका करत इतकी आगपाखड कशासाठी करत आहात असा प्रश्न विचारला.राज ठाकरे नमो पर्यटन केंद्र फोडण्याचा इशारा देतात, कारण त्यांच्याकडून काहीही चांगलं झालं नाही. हे लोक काही निर्माण करू शकत नाहीत, त्यामुळे हे तोडफोडीचीच भाषा करणार. एवढी आगपाखड करण्याची गरज काय? गड-किल्ल्यांवर फिरायला जाणाऱ्या पर्यटकांना माहिती मिळण्यासाठी ते केंद्र सुरू करण्यात येत आहेत. गडकिल्ल्यांचं किंवा मंदिरांच्या जीर्णोद्धाराचं काम महायुतीने केलं.

राहुल गांधींचा सवाल

## पत्रकार परिषदेत पुरावे दाखवत सवाल


# ब्राझीलच्या महिलेने 22 वेळा मतदान केलं

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज हरियाणातील विधानसभा निवडणुकीवरून भाजप आणि निवडणूक आयोगावर नवा बॉम्ब टाकला आहे. ब्राझीलमधल्या मॉडेलने हरियाणात १० वेळा मतदान केल्याचे राहुल यांनी सादरीकरणात दाखवून दिले. स्क्रीनवर सादरीकरण देत राहुल म्हणाले की, हरियाणा विधानसभा निवडणुकीत आमच्या उमेदवाराने काहीतरी चुकीचे असल्याचे सांगितले होते. राहुल गांधी म्हणाले एक्झिट पोलमध्ये काँग्रेसला बहुमत मिळत असल्याचे दाखवले होते. सर्व पोल हे भाकीत करत होते, पण असे काय झाले की हरियाणामध्ये पहिल्यांदाच पोस्टल मत आणि प्रत्यक्ष मतांमध्ये तफावत दिसून आली? आम्ही तपशीलवार शोध घेतला आणि ब्राझीलच्या मॉडेलचं नाव आम्हाला दिसलं.**

## निवडणूक आयोगावर गंभीर आरोप




राहुल म्हणाले की, हरियाणाच्या प्रत्यक्ष मतदान यादीत, एकाच महिलेचा फोटो अनेक ठिकाणी दिसतो. काही लोकांचे वय त्यांच्या फोटोपेक्षा वेगळे असते. मी तुम्हाला विचारतो, ही यादी काय आहे? ही मतदान केंद्रांची यादी आहे. एक महिला दोन मतदान केंद्रांवर २२३ वेळा दिसते. निवडणूक आयोगाने हे स्पष्ट करावे की ही महिला इतक्या वेळा का दिसली. म्हणूनच निवडणूक आयोग सीसीटीव्ही फुटेज काढून टाकतो. हरियाणात अशी हजारो उदाहरणे आहेत. जर सीसीटीव्ही फुटेज नसेल तर कोणालाही कळणार नाही. मला हरियाणाच्या जनतेला हा प्रश्न विचारायचा आहे की ही कोण आहे?निवडणूक आयोगाला स्वच्छ निवडणूक नको आहे. हा ठोस पुरावा आहे. राहुल यांनी एका ब्राझिलियन मुलीचा फोटो दाखवला आणि विचारले, "निवडणुकीत तिची भूमिका काय आहे?" ते म्हणाले की, माझा एक प्रश्न आहे: हरियाणाच्या मतदार यादीत ब्राझिलियन मुलीची भूमिका काय आहे? हरियाणातील पाच श्रेणींमध्ये २५ लाख मते चोरीला गेली. एका विधानसभा मतदारसंघात एका महिलेने २२ वेळा मतदान केले. या महिलेने सरस्वती, स्विटी, संगिता अशा विविध नावांनी मतदान केलं आहे. ही मॉडेल ब्राझीलची आहे. ती हरियाणाच्या मतदार यादीत आहे. तुम्ही तपासून पाहू शकतात. यावरुन हे कळतं आहे की ही खास मोडस ऑपरेंडी आहे. केंद्राकडून हे नाव टाकण्यात आलं आहे. ब्राझीलच्या महिलेने १० बूथवर २२ वेळा मतदान केलं आहे. हरियाणात पाच कॅटेगरीमध्ये २५ लाख मतांची चोरी झाली असा आरोप राहुल गांधी यांनी केला. तसंच सीसीटीव्ही फुटेज हेतुपुरस्सर गायब करण्यात आलं असाही आरोप राहुल गांधी यांनी केला.लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज हरियाणातील विधानसभा निवडणुकीवरून भाजप आणि निवडणूक आयोगावर नवा बॉम्ब टाकला आहे. ब्राझीलमधल्या मॉडेलने हरियाणात १० वेळा मतदान केल्याचे राहुल यांनी सादरीकरणात दाखवून दिले. स्क्रीनवर सादरीकरण देत राहुल म्हणाले की, हरियाणा विधानसभा निवडणुकीत आमच्या उमेदवाराने काहीतरी चुकीचे असल्याचे सांगितले होते. राहुल गांधी म्हणाले एक्झिट पोलमध्ये काँग्रेसला बहुमत मिळत असल्याचे दाखवले होते. सर्व पोल हे भाकीत करत होते, पण असे काय झाले की हरियाणामध्ये पहिल्यांदाच पोस्टल मत आणि प्रत्यक्ष मतांमध्ये तफावत दिसून आली? आम्ही तपशीलवार शोध घेतला आणि ब्राझीलच्या मॉडेलचं नाव आम्हाला दिसलं. राहुल म्हणाले की, हरियाणाच्या प्रत्यक्ष मतदान यादीत, एकाच महिलेचा फोटो अनेक ठिकाणी दिसतो. काही लोकांचे वय त्यांच्या फोटोपेक्षा वेगळे असते. मी तुम्हाला विचारतो, ही यादी काय आहे? ही मतदान केंद्रांची यादी आहे. एक महिला दोन मतदान केंद्रांवर २२३ वेळा दिसते. निवडणूक आयोगाने हे स्पष्ट करावे की ही महिला इतक्या वेळा का दिसली. म्हणूनच निवडणूक आयोग सीसीटीव्ही फुटेज काढून टाकतो. जर सीसीटीव्ही फुटेज नसेल तर कोणालाही कळणार नाही. मला हरियाणाच्या जनतेला हा प्रश्न विचारायचा आहे की ही कोण आहे?निवडणूक आयोगाला स्वच्छ निवडणूक नको आहे. हा ठोस पुरावा आहे.यांनी एका ब्राझिलियन मुलीचा फोटो दाखवला आणि विचारले, "निवडणुकीत तिची भूमिका काय आहे?" ते म्हणाले की, माझा एक प्रश्न आहे.

### ब्राझील मॉडेलबाबत काय म्हणाले?

हरियाणाच्या मतदार यादीत ब्राझिलियन मुलीची भूमिका काय आहे? हरियाणातील पाच श्रेणींमध्ये २५ लाख मते चोरीला गेली. एका विधानसभा मतदारसंघात एका महिलेने २२ वेळा मतदान केले. या महिलेने सरस्वती, स्विटी, संगिता अशा विविध नावांनी मतदान केलं आहे. ही मॉडेल ब्राझीलची आहे. ती हरियाणाच्या मतदार यादीत आहे. तुम्ही तपासून पाहू शकतात. यावरुन हे कळतं आहे की ही खास मोडस ऑपरेंडी आहे.

# चीनची टॅरिफबाबत मोठी घोषणा

## अमेरिकन वस्तूंवरील 24 टक्के आयातशुल्क हटवलं

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चिनी आयातीवर १०० टक्के अतिरिक्त कर लावण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी घेतला होता. त्यांच्या निर्णयाला चीननेही जशास तसं प्रत्युत्तर दिलं होतं. त्यामुळे अमेरिका आणि चीनमध्ये काही दिवसांपूर्वी टॅरिफ वॉर रंगल्याचं पाहायला मिळालं होतं. मात्र, आता अमेरिका आणि चीनमध्ये मैत्रीचा नवा अध्याय सुरू झाल्याचं दिसत आहे.**

गेल्या आठवड्यात चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात एक महत्वाची बैठक झाली होती. या बैठकीत अनेक महत्वाच्या विषयांवर चर्चा झाल्याचं बोललं जात होतं. शी जिनपिंग आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या भेटीनंतर दोन्ही देशांनी संरक्षण क्षेत्रात सहकार्य वाढण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर आता काही दिवसांतच चीनने एक मोठी घोषणा केली आहे. अमेरिकन वस्तूंवरील २४ टक्के आयातशुल्क पुढील एका वर्षासाठी हटवण्याचा निर्णय चीनने घेतला आहे. या संदर्भातील वृत्त रॉयटर्सच्या हवाल्याने इंडिया टुडेनी दिलं आहे.चीनने अमेरिकन




वस्तूंवरील अतिरिक्त २४ टक्के आयातशुल्क एका वर्षासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच १० टक्के कर कायम ठेवला आहे, अशी घोषणा स्टेट कौन्सिल टॅरिफ कमिशनने बुधवारी केली आहे. त्यामुळे जगातील दोन सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांमधील व्यापार तणाव कमी करण्याच्या दिशेने चीनचं हे एक पाऊल असल्याचं बोललं जात आहे.

दरम्यान, टॅरिफ आणि प्रति-टॅरिफ अशा दोन्ही देशांच्या भूमिकेनंतर सुरू झालेल्या आर्थिक संघर्षानंतर द्विपक्षीय व्यापार संबंध स्थिर करण्यासाठी काही निर्णय घेण्याची आवश्यकता होती.

याच पार्श्वभूमीवर दोन्ही देशांच्या या प्रयत्नांचा एक भाग म्हणून या निर्णयाकडे पाहिलं जात आहे. या निर्णयाचा फायदा सोयाबीन, मका, गहू आणि मांस यासारख्या उत्पादनांच्या अमेरिकन निर्यातदारांना होण्याची शक्यता आहे. कारण दोन्ही देशांमधील व्यापार वादामुळे सर्वात जास्त फटका या उत्पादनांना बसला होता.अमेरिका आणि चीनमध्ये टॅरिफच्या मुद्द्यांवरून आजही उघडपणे मतभेद आहेत. पण असं असतानाही आता अमेरिका आणि चीनमध्ये मैत्रीचा नवा अध्याय सुरू झाल्याचं दिसून येत आहे.

### माध्यम तयार करण्यास सहमती

दोन्ही देशांनी संरक्षण क्षेत्रात सहकार्य वाढण्याचा निर्णय घेतला आहे. आता अमेरिका आणि चीन या दोन देशांच्या लष्करांमध्ये थेट संवाद साधण्यासाठी एक अनौपचारिक किंवा औपचारिक माध्यम तयार करण्यास सहमती दर्शवली आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

# उर्वशी रौतेलाच्या वक्तव्यामुळे नवा वादंग



बॉलीवूड अभिनेत्री उर्वशी रौतेला ही नेहमी चर्चेत असते. कधी सुंदर, स्टनिंग, ग्लॅमरस फोटोमुळे तर कधी डान्समुळे उर्वशी चर्चेत असते. नुकतंच तिनं असं काही विधान केलं आहे, ज्यामुळे नव्या वादाला तोंड फुटलं आहे. तिच्या वक्तव्यामुळे बद्रीनाथ धामचे पंडितांनी संताप व्यक्त केला आहे. नेमकं हे प्रकरण काय आहे? जाणून घ्या... काही दिवसांपूर्वी उर्वशी रौतेलाने सिद्धार्थ कन्ननच्या मुलाखतीमध्ये म्हटलं होतं की, बद्रीनाथ धामजवळ माझ्या नावाचं एक मंदिर आहे. जिथे लोक जातात आणि फुल वाहून पूजा करतात. तेव्हा सिद्धार्थने विचारलं, "हे तुझं मंदिर आहे." तेव्हा अभिनेत्री म्हणाली, "हो, माझं मंदिर आहे. तसंच माझी इच्छा आहे की, दक्षिण भारतातदेखील माझं एक मंदिर असावं." उर्वशीच्या याच वक्तव्यामुळे वादंग निर्माण झाला आहे. तिच्या वक्तव्यांवर पंडितांनी संताप व्यक्त केला आहे. "हा सर्व मूर्खपणा आहे, ते मंदिर तिचं नाही तर उर्वशी नावाच्या देवी सतीचे आहे", असं पंडितांनी स्पष्ट केलं आहे.ते म्हणाले की, "उर्वशी मंदिर हिंदू पौराणिक कथांमध्ये पूजनीय असलेल्या देवी सतीशी संबंधित आहे. हे १०८ शक्तीपीठांपैकी एक मानले जाते." 'इंडिया टुडे' या वृत्तसंस्थेशी संवाद साधताना ते म्हणाले, "हे तिचं मंदिर नाही. अशी विधाने अस्वीकार्य आहेत आणि सरकारने असे दावे करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे." ब्रह्म कपाल तीर्थ पुजारी सोसायटीचे अध्यक्ष अमित सती यांनीही उर्वशीच्या वक्तव्याचा निषेध केला आहे. ते म्हणाले की, अशा वक्तव्यांमुळे येथील लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जातात. त्यामुळे उर्वशी रौतेलाने माफी मागितली पाहिजे. उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यातील बामणी गावात उर्वशी मंदिर आहे. बद्रीनाथ धामपासून एक किलोमीटर अंतरावर हे मंदिर आहे. त्यामुळे बद्रीनाथ धामला जाणारे सर्व प्रवासी या मंदिरात जाऊन दर्शन घेतात. या मंदिरासंबंधित बऱ्याच पौराणिक कथा आहेत. नवरात्रीमध्ये या मंदिरात विशेष सोहळ्याचं आयोजन केलं आहे.बॉलीवूड अभिनेत्री उर्वशी रौतेला ही नेहमी चर्चेत असते. कधी सुंदर, स्टनिंग, ग्लॅमरस फोटोमुळे तर कधी डान्समुळे उर्वशी चर्चेत असते. नुकतंच तिनं असं काही विधान केलं आहे, ज्यामुळे नव्या वादाला तोंड फुटलं आहे. तिच्या वक्तव्यामुळे बद्रीनाथ धामचे पंडितांनी संताप व्यक्त केला आहे.

## ती कॉलेजला 20 लाखांच्या गाडीतून यायची

कपिल शर्मा हिंदी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय चेहरा आहे. अनेक वर्ष तो 'द कपिल शर्मा शो'मधून प्रेक्षकांचं मनोरंजन करायचा. त्यानं चित्रपटातही काम केलं आहे. त्याशिवाय कपिलचा स्वत:चा व्यवसायही आहे. सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या कपिलनं आज इंडस्ट्रीत स्वत:ची वेगळी जागा निर्माण केली आहे. कपिल आज हिंदी टेलिव्हिजनवरील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या कलाकारांपैकी एक आहे. तो अनेकदा कुठल्या ना कुठल्या कारणामुळे चर्चेत असतो. त्याच्या नेटफ्लिक्सवरील 'द ग्रेट इंडियन कपिल शो'मुळे तो चर्चेत असायचा. अशातच आता त्यानं नेटफ्लिक्स स्पेशल कपिल शर्मामध्येच त्याची बायको गिनीबरोबरच्या प्रेमकहाणीची माहिती दिली आहे.कपिल म्हणाला, "गिनीची आणि माझी पहिली भेट कॉलेजमध्ये झालेली. ती कॉलेजला यायची २० लाखांच्या गाडीतून आणि मी त्यावेळी सेकंड हॅण्ड स्कूटर खरेदी केली होती. माझे मित्र येऊन मला सांगायचे की, तिला तू आवडतोस. तेव्हा माझा विश्वास बसायचा नाही.

## आयशाने दिलं चांगलंच उत्तर

बऱ्याच काळानंतर 'वाँटेड' फेम अभिनेत्री आयशा टाकिया काही दिवसांपूर्वी मुंबई विमानतळावर दिसली होती. यादरम्यानचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. पण आयशाच्या लूकवरून लोकांनी तिला ट्रोल केलं. "प्लास्टिक सर्जरी करून हिने स्वतःचा चेहरा बिघडवला', अशा आशयाच्या अनेक प्रतिक्रिया लोकांनी तिच्या व्हिडीओवर दिल्या होत्या. एवढंच नाहीतर लोकांनी तिला शरीर रचनेवरून ट्रोल केलं होतं. मात्र आता ट्रोलर्सला आयशाने चांगलंच उत्तर दिलं आहे.अभिनेत्री आयशा टाकियाने ट्रोल झाल्यानंतर सोशल मीडियावर भलीमोठी पोस्ट लिहिली आहे. आयशा म्हणाली, "मला हे सांगण्याची गरज आहे. दोन दिवसांपूर्वी माझ्या कुटुंबात मेडिकल इमरजेंसी असल्यामुळे गोव्याला निघाले होते. माझी बहीण हॉस्पिटलमध्ये आहे. यादरम्यान मला विमानतळावर काही पापाराझींना थांबवलं. त्यामुळे काही वेळात मी पापाराझींसाठी पोझ दिल्या. पण आपल्या देशात माझ्या लूकवर बोलण्याशिवाय इतर कोणतेही महत्त्वाचे मुद्दे नाहीत, असं मला वाटतं. अनेक जण बेताल मतं मांडत आहेत. मला कसं दिसायला पाहिजे होतं आणि कसं नाही याविषयी बोललं जात आहे. पण मला कुठलाही चित्रपट करण्यात किंवा पुन्हा कमबॅक करण्यात अजिबात रस नाही.



## तर लोक थिएटर जाळून टाकतील

अरविंद स्वामी व मनीषा कोईराला यांची प्रमुख भूमिका असलेला 'बॉम्बे' हा चित्रपट १९९५ साली प्रदर्शित झाला. प्रसिद्ध दिग्दर्शक मणिरत्नम यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते, तर राजीव मेनन यांनी या चित्रपटाचे शूटिंग केले होते.आता नुकतीच राजीव मेनन यांनी ०२ इंडिया या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत राजीव मेनन म्हणाले, "बॉम्बे सारखा चित्रपट आज बनवला जाऊ शकत नाही. भारतातील परिस्थिती अस्थिर आहे. लोक विरोध करतात. धर्म हा मोठा मुद्दा बनला आहे. मला वाटत नाही की तुम्ही 'बॉम्बे'सारखा चित्रपट आता बनवू शकता. तो थिएटरमध्ये प्रदर्शित करू शकता. असे चित्रपट आता प्रदर्शित केले तर लोक थिएटर जाळून टाकतील.

गेल्या २५-३० वर्षांत भारतातील सहिष्णुता कमी झाली आहे. "दिग्दर्शक मणिरत्नम यांनी चित्रपटात हिंसाचाराच्या सीनसाठी ए आर रहमान यांनी रचलेल्या संगीताचा वापर केला. यावर बोलताना राजीव मेनन म्हणाले, "चित्रपटात जी हिंसाचाराची दृश्ये होती, त्यासाठी ए आर रेहमानचे संगीत आहे. ते सीन वेदनादायक होते, त्याप्रमाणेच संगीतही वेदनादायक होते. त्यामध्ये ढोल वाजल्याचा किंवा व्हायोलिनचा आवाज येत नाही. हिंसाचारातील वेदना त्या संगीतातून जाणवते.



## महिनाभरातच धनश्री दिली आनंदाची बातमी

गेल्या काही महिन्यांपासून भारताचा क्रिकेटपटू युजवेंद्र चहल आणि धनश्री वर्मा यांचा घटस्फोट होणार असे बोलले जात होते. अखेर २० मार्च रोजी त्यांचे नाते संपुष्टात आले. मुंबईतील वांद्रे कौटुंबिक न्यायालयामध्ये त्यांच्या घटस्फोटाची सुनावणी झाली. २२ डिसेंबर २०२० रोजी युजवेंद्र आणि धनश्री लग्नाच्या बेडीत अडकले होते. घटस्फोट घेतल्यानंतर धनश्री तिच्या करिअरवर लक्ष केंद्रित करताना दिसत आहे. धनश्री सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. सोशल मीडियावर ती तिचे अनेक फोटो व व्हिडीओ शेअर करत चाहत्यांच्या संपर्कात राहत असते. धनश्री उत्तम नृत्यांगणा आहे आणि तिच्या नृत्याचे अनेक व्हिडीओ ती सोशल मीडियावर शेअर करत असते. नृत्यांगणा असण्याबरोबरच धनश्री एक अभिनेत्री आहे आणि लवकरच ती सिनेसृष्टीत पदार्पण करणार आहे. याबद्दल धनश्रीने स्वत:च माहिती दिली आहे.धनश्रीने स्वतः तिचे काही खास फोटो सोशल मीडियावर शेअर करत पहिला चित्रपट येणार असल्याचे म्हटलं आहे. धनश्री बऱ्याच दिवसांपासून हैदराबादमध्ये तिच्या आगामी चित्रपटाचे चित्रीकरण करत होती. याच चित्रीकरणाचे आणि टीमचे काही खास क्षण तिने पोस्टद्वारे शेअर केले आहेत. ती ज्येष्ठ चित्रपट निर्माते दिल राजू यांच्या प्रॉडक्शनच्या आगामी चित्रपटातून मोठ्या पडद्यावर एन्ट्री करणार आहे.या पोस्टमध्ये धनश्रीने असं म्हटलं आहे की, "माझा पहिला आणि खास चित्रपट. पहिला चित्रपट पूर्ण केल्याची भावना काही वेगळीच असते. यासाठी मी खूप उत्साहित आणि चिंताग्रस्त आहे.

काय आहे टॅटूमधील आकड्यांचा अर्थ? ट्रॉफी टॅटू काढला आणि २०२५ आकडा लिहिला

# कौरचा वर्ल्डकप स्पेशल टॅटू!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय महिला क्रिकेट संघाने पहिलाच एकदिवसीय विश्वचषक आपल्या नावे केला आहे. भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत ५२ धावांनी सामना जिंकला आणि इतिहास घडवला. तब्बल २५ वर्षांनंतर महिला एकदिवसीय विश्वचषकाच्या इतिहासात इंग्लंड, ऑस्ट्रेलिया व इंग्लंड हे संघ सोडून इतर संघाने जेतेपद आपल्या नावे केलं. भारतीय संघाने कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वाखाली वर्ल्ड चॅम्पियन होण्याचा मान मिळवला. वर्ल्ड चॅम्पियन ठरल्यानंतर हरमनने खास टॅटू काढला आहे.**

## दररोज तुला पाहून कृतज्ञ राहीन




हरमनप्रीत कौरने संपूर्ण स्पर्धेत संघाचं उत्कृष्ट नेतृत्त्व केलं. अंतिम सामन्यातही हरमनने गोलंदाजांना उत्कृष्ट रितीने वापरत संघाला विजयाकडे नेलं. सर्वात लक्षवेधी गोष्ट म्हणजे संघाला विकेटची गरज असताना हरमनने गोलंदाजांचे पर्याय तपासून पाहिले, पण विकेट मिळत नव्हती. यादरम्यान हरमनने एक मोठा डाव खेळला आणि तिने पार्ट टाईम गोलंदाज शफाली वर्माला गोलंदाजी दिली. हरमनप्रीतचा हा निर्णय सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरला. हरमनने शफाली वर्माला गोलंदाजी दिली आणि तिने दोन षटकांत दोन मोठे विकेट घेतले. सुरूवातीला तिने सुने लुसला झेलबाद केलं तर दुसऱ्या षटकात मारिझन कापला झेलबाद करवत दुसरी सर्वात मोठी विकेट मिळवून दिली. यानंतर हरमनने दीप्ती शर्माच्या चेंडूवर एक कमालीचा झेल टिपला आणि तिथेच दक्षिण आफ्रिकेचा संघ सर्वबाद झाला आणि भारत विश्वविजेता ठरला.हरमनप्रीत कौरने या सामन्यानंतर एक खास टॅटू काढला आहे. हरमनने डाव्या हातावर वर्ल्डकप ट्रॉफी असलेला टॅटू काढला आहे आणि २०२५ आकडा लिहिला आहे. या पोस्टच्या कॅप्शनमध्ये तिने लिहिलं आहे, “माझ्या हृदयावर आणि हातावर कायमचं कोरला गेला क्षण. पहिल्या दिवसापासून तुझी वाट पाहत होते आणि आता दररोज तुला पाहून कृतज्ञ राहीन,” असं तिनं तिच्या नव्या टॅटूच्या फोटोला कॅप्शन दिलं.हरमनप्रीत कौरच्या या टॅटूमध्ये २०२५ शिवाय ५२ आकडाही तिच्या टॅटूमध्ये लिहिला आहे. दुसरा आकडा महिला विश्वचषक अंतिम सामन्यात भारताने ५२ धावांनी विजय मिळवला आहे यासंबंधित असू शकतो. याशिवाय हा महिला विश्वचषकाचा ५२ वा सीझन होता, जो भारताने जिंकला. महिला विश्वचषकाला १९७३ मध्ये सुरुवात झाली होती.लहानपणी वर्ल्डकप जिंकण्याचं पाहिलेलं स्वप्न पूर्ण केल्यानंतर, भारतीय कर्णधाराने पुढच्या पिढीसाठी एक प्रेरणा देणारा मेसेजही दिला. हरमन म्हणाली, “स्वप्न पाहणं कधीच थांबवू नका. तुमचं नशीब तुम्हाला कुठे घेऊन जाईल, हे कुणालाच माहीत नसतं.”भारतीय महिला क्रिकेट संघाने पहिलाच एकदिवसीय विश्वचषक आपल्या नावे केला आहे. भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत ५२ धावांनी सामना जिंकला आणि इतिहास घडवला. तब्बल २५ वर्षांनंतर महिला एकदिवसीय विश्वचषकाच्या इतिहासात इंग्लंड, ऑस्ट्रेलिया व इंग्लंड हे संघ सोडून इतर संघाने जेतेपद आपल्या नावे केलं. भारतीय संघाने कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वाखाली वर्ल्ड चॅम्पियन होण्याचा मान मिळवला. वर्ल्ड चॅम्पियन ठरल्यानंतर हरमनने खास टॅटू काढला आहे. हरमनप्रीत कौरने संपूर्ण स्पर्धेत संघाचं उत्कृष्ट नेतृत्त्व केलं. अंतिम सामन्यातही हरमनने गोलंदाजांना उत्कृष्ट रितीने वापरत संघाला विजयाकडे नेलं. सर्वात लक्षवेधी गोष्ट म्हणजे संघाला विकेटची गरज असताना हरमनने गोलंदाजांचे पर्याय तपासून पाहिले, पण विकेट मिळत नव्हती. यादरम्यान हरमनने एक मोठा डाव खेळला आणि तिने पार्ट टाईम गोलंदाज शफाली वर्माला गोलंदाजी दिली.हरमनप्रीतचा हा निर्णय सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरला. हरमनने शफाली वर्माला गोलंदाजी दिली आणि तिने दोन षटकांत दोन मोठे विकेट घेतले. सुरूवातीला तिने सुने लुसला झेलबाद केलं तर दुसऱ्या षटकात मारिझन कापला झेलबाद करवत दुसरी सर्वात मोठी विकेट मिळवून दिली. यानंतर हरमनने दीप्ती शर्माच्या चेंडूवर एक कमालीचा झेल टिपला आणि तिथेच दक्षिण आफ्रिकेचा संघ सर्वबाद झाला आणि भारत विश्वविजेता ठरला. हरमनप्रीत कौरने या सामन्यानंतर एक खास टॅटू काढला आहे. हरमनने डाव्या हातावर वर्ल्डकप ट्रॉफी असलेला टॅटू काढला आहे आणि २०२५ आकडा लिहिला आहे. या पोस्टच्या कॅप्शनमध्ये तिने लिहिलं आहे,“माझ्या हृदयावर आणि हातावर कायमचं कोरला गेला क्षण. पहिल्या दिवसापासून तुझी वाट पाहत होते आणि आता दररोज तुला पाहून कृतज्ञ राहीन,” असं तिनं तिच्या नव्या टॅटूच्या फोटोला कॅप्शन दिलं.

### पुढच्या पिढीसाठी एक प्रेरणा

या टॅटूमध्ये २०२५ शिवाय ५२ आकडाही तिच्या टॅटूमध्ये लिहिला आहे. दुसरा आकडा महिला विश्वचषक अंतिम सामन्यात भारताने ५२ धावांनी विजय मिळवला आहे यासंबंधित असू शकतो. याशिवाय हा महिला विश्वचषकाचा ५२ वा सीझन होता, जो भारताने जिंकला. महिला विश्वचषकाला १९७३ मध्ये सुरुवात झाली होती स्वप्न पूर्ण केल्यानंतर, भारतीय कर्णधाराने पुढच्या पिढीसाठी एक प्रेरणा देणारा मेसेजही दिला.

# जेमिमा-राधा पुणेरी ढोलवर थिरकल्या!

## टीम इंडियाचं दिल्लीत जंगी स्वागत; पंतप्रधान मोदींच्या भेटीला जाणार?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील वर्ल्ड चॅम्पियन भारतीय महिला क्रिकेट संघ मंगळवारी संध्याकाळी दिल्लीत दाखल झाला. विश्वचषक विजेत्या भारतीय महिला संघाचं दिल्लीत दणक्यात स्वागत करण्यात आलं. भारतीय संघ दिल्लीमध्ये ५ नोव्हेंबरला पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेणार आहे.**



अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला ५२ धावांनी पराभूत करत संघाने इतिहास घडवला. भारतीय संघाने पहिल्यांदा महिला विश्वचषकाचे जेतेपद पटकावले. नवी मुंबईतील डी वाय पाटील मैदानावर खेळला हा अंतिम सामना भारतीय महिला क्रिकेटसाठी एक संस्मरणीय क्षण ठरला. बुधवारी हा संघ पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटणार आहे.मुंबई विमानतळावर संघाचं वाजत गाजत कौतुक करण्यात आलं. प्रशिक्षक अमोल मजुमदार आणि सर्व खेळाडू उपस्थित होते. मोठ्या संख्येने चाहते आले होते, जे टाळ्या वाजवत इंडिया इंडियाचे नारे देत जल्लोष करत होते. दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर, जनरल एव्हिएशन टर्मिनलवर फक्त मीडिया उपस्थित होती. सुरक्षेच्या कारणास्तव, लोकांना आत जाऊ दिलं गेलं नाही. त्यानंतर, सर्वजण लगेच हॉटेलकडे रवाना झाले. हॉटेलबाहेरही टीम इंडियाच्या स्वागतासाठी जय्यत तयारी करण्यात आली होती. इंडिया इंडियाचे नारे सुरू होते. याशिवाय हॉटेलबाहेर पुणेरी ढोलही होते. राधा यादव, जेमिमा रॉड्रीग्ज व स्नेह राणाने नाचत याचा आनंद साजरा केला.बुधवारी संध्याकाळी पंतप्रधानांच्या निवासस्थानी संघ संध्याकाळी ६ वाजता भेटीला जाणार आहे.

### शफाली वर्मा नागालँडला जाणार

करतील आणि त्यांच्याशी चर्चा केली जाईल. त्यानंतर, सर्व खेळाडू आपापल्या घरी रवाना होतील. फक्त शफाली वर्मा नागालँडला जाणार आहे, जिथे ती उत्तर विभागीय महिला संघाचं नेतृत्व करेल आणि आंतर-क्षेत्रीय टी-२० स्पर्धेतही सहभागी होईल.कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील वर्ल्ड चॅम्पियन भारतीय महिला क्रिकेट संघ मंगळवारी संध्याकाळी दिल्लीत दाखल झाला.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। गुरुवार।

। दि. 6 नोव्हेंबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। गुरुवार।
। दि. 6 नोव्हेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## मोशी प्राधिकरण येथे त्रिवृक्ष संगम दत्त मंदिरात

# भव्य सामूहिक अग्निहोत्र सोहळा!

### भाजपा मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे यांचा पुढाकार, परिसरातील नागरिकांना अध्यात्मिक मेजवानी

**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

मोशी प्राधिकरण येथील त्रिवृक्ष संगम दत्त मंदिरात आगामी रविवार, ९ नोव्हेंबर रोजी भव्य सामूहिक अग्निहोत्र व चैतन्य पादुकांचे पूजन व दर्शन सोहळा आयोजित करण्यात येत आहे. या सोहळ्याचे नेतृत्व भारतीय जनता पक्षाचे मंडल अध्यक्ष श्री. शिवराज सुदामराव लांडगे करणार आहेत.

शिवराज लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली, श्री स्वामी समर्थ महाराज, अक्कलकोट यांच्या आज्ञेनुसार स्थापन झालेल्या दिव्य गुरुपीठावरून परमसदगुरू श्री गजानन महाराज यांनी सर्वांच्या कल्याणासाठी 'नित्य अग्निहोत्र' करण्याचा शुभसंदेश दिला आहे. लांडगे यांनी या धार्मिक उपक्रमातून समाजातील प्रत्येक घरात अग्निहोत्र करण्याची प्रेरणा दिली आहे.

सोहळा संध्याकाळी ४:३० वा. सुरू होईल, तर महाप्रसाद संध्याकाळी ५:३० ते ८:०० वा. उपलब्ध राहणार आहे. मार्गदर्शनाचे कार्य डॉ. पुरुषोत्तम राजीमवाले करणार आहेत. संपूर्ण कार्यक्रम निःशुल्क असून सर्व उपस्थितांना सहभागी होण्याचे आमंत्रण देण्यात आले आहे. शिवराज लांडगे यांनी सामाजिक आणि धार्मिक बांधिलकी यावर विशेष भर दिला आहे आणि नागरिकांना एकत्र येऊन अध्यात्मिक अनुभव घेण्यास प्रोत्साहित केले आहे. कार्यक्रमात मा. श्री. महेशदादा किसनराव लांडगे (आमदार, भोसरी विधानसभा) आणि सौ. निलम शिवराज लांडगे (अध्यक्षा, इंद्रायणी महिला प्रतिष्ठाण) उपस्थित राहणार आहेत.

> “ भव्य सामूहिक अग्निहोत्र सोहळा केवळ धार्मिक विधी नाही, तर समाजातील प्रत्येक घरात अध्यात्मिक ऊर्जा प्रसारित करण्याची संधी आहे. घराघरात अग्निहोत्र करण्याने केवळ वैयक्तिक कल्याण होत नाही, तर समाजातील एकात्मता आणि सकारात्मक ऊर्जा वाढते. या कार्यक्रमातून नागरिकांना एकत्र येऊन मन, घर आणि समाज या तीनही स्तरांवर शांती, समृद्धी आणि सुसंवाद साधण्याची प्रेरणा मिळेल. मला विश्वास आहे की या प्रकारच्या अध्यात्मिक उपक्रमांमुळे समाजाची मानसिक आणि आध्यात्मिक उन्नती होईल आणि प्रत्येकाच्या जीवनात नवीन प्रेरणा निर्माण होईल.
>
> **- शिवराज लांडगे, मंडलाध्यक्ष, भाजपा**



## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक

# पुणे जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीचा “देवाभाऊ पॅटर्न”!

### शतप्रतिशत भाजपाचा निर्धार: निकटवर्ती आमदार महेश लांडगे अन् राहुल कुल यांच्यावर

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत “शतप्रतिशत भाजपा” असा निर्धार करण्यात आला असून, भाजपा पक्षश्रेष्ठींनी जिल्हा निवडणूक प्रमुख आणि प्रभारी यांनी नियुक्ती करीत ‘एक पाऊल पुढे’ टाकले आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा बालेकिल्ला असलेल्या पुणे जिल्ह्यात भाजपा “देवाभाऊ पॅटर्न” राबवण्याच्या तयारी आहे.**




स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी भाजपाने जिल्हा निवडणूक प्रमुख आणि प्रभारी यांची घोषणा केली. पुणे जिल्ह्यात उपमुख्यमंत्री पवार यांचे ग्रामीण भागात चांगले वर्चस्व आहे. या ठिकाणी भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी असाच सामना रंगणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या हक्काचे दोन हुकमी एक्के बाहेर काढले आहेत.

पिंपरी-चिंचवडमधून भाजपाचे भोसरी विधानसभेतील आमदार महेश लांडगे यांना पुणे उत्तर (मावळ) मध्ये “जिल्हा निवडणूक प्रमुख” अशी जबाबदारी देण्यात आली आहे. तर दक्षिण पुणे जिल्हा (बारामती) निवडणूक प्रमुखपदी आमदार राहुल कुल यांना जबाबदारी सोपवली आहे. लांडगे आणि कूल दोघेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांना स्थानिक पातळीवर आव्हान देणारे लोकप्रतिनिधी म्हणून ओळखले जातात.

मध्यंतरी आमदार महेश लांडगे यांनी “पुणे जिल्ह्याचे विभाजन करा आणि उत्तर पुणे जिल्ह्याला “शिवनेरी” असे नाव द्या” अशी जाहीर मागणी केली होती. यावरुन अजित पवार विरुद्ध महेश लांडगे असा राजकीय संघर्ष सुरू झाला होता. त्यानंतर विधानसभा निवडणुकीतही लांडगे यांनी पवार यांच्याविरोधात दंड थोपाटले होते. 2017 मध्ये दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्यासोबत महेश लांडगे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत भाजपाची सत्ता खेचून आणली आणि अजित पवार यांचा बालेकिल्ला काबिज केला होता. दुसरीकडे, आमदार राहुल कुल यांच्या सौभाग्यवती कांचन कुल यांनी 2019 मध्ये बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या विरोधात लोकसभा निवडणूक लढवली होती. त्यापूर्वी, 2009 मध्ये राष्ट्रवादीने विधानसभा निवडणुकीत बंडखोर उमेदवाराला मदत केली, त्यावरुन नाराज झालेल्या राहुल कुल यांनी सुरूवातीला रासप आणि 2019 मध्ये भाजपात प्रवेश केला होता. पवार कुटुंबियांना थेट आव्हान देणारा नेता म्हणून कुल यांची ओळख आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार महेश लांडगे आणि आमदार राहुल कुल यांना मोठी ताकद दिली आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत पुणे उत्तर आणि दक्षिण दिग्विजय करण्यासाठी भाजपाने “देवाभाऊ पॅटर्न” राबवण्याचे निश्चित केले आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

**पुणे जिल्ह्यात देवाभाऊंची “कमांड”**

विशेष म्हणजे, पुण्यात मंत्री चंद्रकांत पाटील, माधुरी मिसाळ, आमदार सिद्धार्थ शिरोळे असे मातब्बर असताना नवख्या गणेश बिडकर यांच्याकडे धुरा सोपवण्यात आली. तर पिंपरी-चिंचवडमध्ये माजी खासदार अमर साबळे, विधान परिषद आमदार अमित गोरखे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे असे नेते आहेत. त्यांच्याकडे जबाबदारी न देता आमदार शंकर जगताप यांची निवडणूक प्रमुखपदी नियुक्ती केली आहे. तसेच, पुणे जिल्हा निवडणूक प्रभारी म्हणून केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे धुरा आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. त्यामुळे फडणवीस यांनी पहिल्याच टप्प्यात पुणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांवर “कमांड” मिळवली आहे, असे चित्र आहे.

### पुण्यात बिडकर, पिंपरी-चिंचवडमध्ये जगताप…

पुणे महानगरपालिका क्षेत्रात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक प्रमुख म्हणून गणेश बिडकर यांची नियुक्ती झाली आहे. तर पिंपरी-चिंचवडमध्ये निवडणूक प्रमुख म्हणून चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांना जबाबदारी दिली आहे. बिडकर आणि जगताप हेसुद्धा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या शब्दाबाहेर नाहीत. पिंपरी-चिंचवड आणि पुण्यातील शहराध्यक्ष पदाच्या नियुक्तीवरुन काही प्रमाणात कुरबुरी होत्या. पुण्यात घाटेंना आणि पिंपरी-चिंचवडमध्ये काटेंना शहराध्यक्षपदी संधी दिल्यामुळे बिडकर आणि जगताप यांच्यात नाराजी होती, असे बोलले जाते. या ‘गृहकलहाचा’ परिणाम आगामी महापालिका निवडणुकीत होवू नये. या करिता शहराध्यक्षांना निवडणूक प्रमुखपदाची जबाबदारी न देता पुण्यातून बिडकर आणि पिंपरी-चिंचवडमधून जगताप यांच्याकडे धुरा दिली आहे. महापालिका निवडणूक स्वबळावर झाल्यास, जगताप आणि बिडकर यांना भाजपाच्या “परफॉर्मन्स”ची जबाबदारीही घ्यावी लागणार आहे. किंबहुना, राष्ट्रवादी अजित पवार गटासोबत दोन हात करण्यासाठी स्थानिक पातळीवर रणनिती आखावी लागणार आहे.

---

## हिंदुभूषण क्रीडामहोत्सव-2025 अंतर्गत ‘सोसायटी प्रीमियर लीग’!

# दिघी-बोपखेलमध्ये रंगणार "टर्फ क्रिकेट" स्पर्धा!

### आमदार महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

भोसरी विधानसभेचे दमदार आमदार पैलवान महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित हिंदुभूषण क्रीडामहोत्सव - २०२५ अंतर्गत दिघी-बोपखेल प्रभाग क्रमांक ०४ येथील सोसायटी धारकांसाठी ‘भव्य दिघी-बोपखेल सोसायटी प्रीमियर लीग (टर्फ क्रिकेट स्पर्धा)’ आयोजित करण्यात आली आहे.केले.

ही स्पर्धा १६ ते २२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत दररोज सायंकाळी ६ ते रात्री ११ या वेळेत होणार आहे. या स्पर्धेचे आयोजन एके टर्फ, दत्तनगर, दिघी येथे भाजप युवा मोर्चा,



भोसरी-चऱ्होली मंडल अध्यक्ष उदय गायकवाड यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

याबाबत गायकवाड म्हणाले या लीगमध्ये दिघी-बोपखेल परिसरातील सर्व सोसायट्यांनी आणि रहिवासी बांधवांनी सहभाग नोंदवावा या उपक्रमाचा उद्देश स्थानिक युवकांमध्ये क्रीडा संस्कृती रुजवणे, सामाजिक एकता मजबूत करणे असा असल्याचे त्यांनी सांगितले. या स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या संघांनी आपला सहभाग नोंदविण्यासाठी ९७३९३ ९९७३९ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन आयोजक उदय गायकवाड यांनी केले आहे.

> "क्रीडा फक्त मैदानातले खेळ नसून ती युवकांना एकत्र आणणारी आणि समाजाची एकता घडवणारी शक्ती आहे. दिघी-बोपखेल सोसायटी प्रीमियर लीगमधून आपण फक्त स्पर्धा पाहत नाही, तर आपली एकता, ऊर्जा आणि क्रीडा संस्कृतीचा उत्साह वाढवतो. मी सर्व सोसायटीधारकांना आणि युवकांना आमंत्रित करतो की, या उपक्रमात सहभागी होऊन समाजात सशक्त बंध तयार करा."


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION
OPEN
FOR THE YEAR
2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers
for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune



**पुणे:** जयाद्रीशक्तिपीठ असलेल्या जेजुरी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या जननी तीर्थ कुंड येथे जयाद्री मित्र परिवाराच्या वतीने त्रिपुरी पौर्णिमेच्या निमित्त शेकडो दिवे लावण्यात आले. **(फोटो: विजयकुमार हरिश्चंद्रे)**